15 APR 2025 सकाळ जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना लोकशाहीकडे नेणारे शिक्षण अभिप्रेत

## डॉ. गौतम गवळी : शिवाजी विद्यापीठात विशेष व्याख्यान

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १४ : समताधिष्ठित लोकशाहीकडे घेऊन जाणारे शिक्षण भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत होते, असे प्रतिपादन ॲमिटी विद्यापीठाचे डेप्युटी प्र-कुलगुरू डॉ. गौतम गवळी यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहांतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त आयोजित विशेष व्याख्यानात 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार व कार्य' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील व्याख्यानात बोलताना डॉ. गौतम गवळी.

टी. शिर्के, तर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित होते.

डॉ. गवळी म्हणाले, 'डॉ. आंबेडकर यांच्या समग्र चळवळीचे ध्येय हे व्यक्तिमत्त्व पुनर्स्थापनेचे होते. त्यासाठी त्यांनी आयुष्यभर शिक्षणाचा ध्यास घेतला. त्यांच्या दृष्टीने समता, स्वातंत्र्य आणि बंधुता ही जीवनकौशल्ये आहेत. या कौशल्यांचा मानवी व्यक्तिमत्त्वात विकास होणे आवश्यक असल्याचे त्यांचे मत होते.' कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'महामानवांची प्रतीके, प्रतिरूपे ही प्रेरणादायी असतात. मात्र, त्याच बरोबरीने त्यांच्या विचारांचा अंश आपल्या व्यक्तिमत्त्वात उतरवणे अधिक आवश्यक आहे.' डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी स्वागत केले. अविनाश भाले यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.

## विद्यार्थ्यांची उत्साही संविधान रॅली

■ कार्यक्रमापूर्वी विद्यापीठाच्या वसतिगृहातील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी विद्यापीठ परिसरातून संविधान रॅली काढून बाबासाहेबांना अभिवादन केले. डॉ. आंबेडकर यांची प्रतिमा नारळाच्या झावळ्या आणि फुलांनी सुशोभित केलेल्या बैलगाडीमध्ये ठेवली होती. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज, सावित्रीबाई फुले आणि माता रमाई आंबेडकर यांच्या वेशभूषेतील विद्यार्थी रॅलीचे नेतृत्व करीत होते. ढोल, ताशा आणि झांजपथकाच्या तालावर विद्यार्थ्यांनी लेझीमची प्रात्यक्षिकेही सादर केली. विद्यार्थ्यांनी हातात संविधानाच्या प्रतिकृतीसह विविध संविधानिक मूल्ये, कलमांचे फलक घेतले होते. रॅली मुख्य प्रशासकीय भवन येथे विसर्जित करण्यात आली. तेथे कुलगुरू आणि प्र-कुलगुरू यांच्या हस्ते डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन केले. यावेळी डॉ. अजितसिंह जाधव, शरद बनसोडे, रामचंद्र पवार, ए. बी. कोळेकर, कैलास सोनवणे, प्रकाश कांबळे, सुनील गायकवाड, किशोर खिलारे, तेजपाल मोहरेकर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 APR 2025
पुण्यनगरी

# लोकशाहीकडे नेणारे शिक्षण डॉ. आंबेडकर यांना अभिप्रेत

## डॉ. गौतम गवळी; शिवाजी विद्यापीठात व्याख्यान



डॉ. गौतम गवळी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

समताधिष्ठित लोकशाहीकडे घेऊन जाणारे शिक्षण भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत होते, असे प्रतिपादन ॲमिटी विद्यापीठाचे डेप्युटी प्र-कुलगुरू डॉ. गौतम गवळी यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहांतर्गत सोमवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त आयोजित विशेष व्याख्यानात 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार व कार्य' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनीही मनोगत व्यक्त केले. स्वागत डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले. अविनाश भाले यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले.

विद्यापीठाच्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांनी विद्यापीठ परिसरातून संविधान रॅली काढून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जयंतीनिमित्त अभिवादन केले. डॉ. आंबेडकर यांची प्रतिमा नारळाच्या झावळ्या आणि फुलांनी सुशोभित केलेल्या बैलगाडीमध्ये ठेवली होती. डॉ. आंबेडकर यांच्यासह छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज, सावित्रीबाई फुले आणि माता रमाई आंबेडकर यांच्या वेशभूषेतील विद्यार्थी रॅलीचे नेतृत्व करत होते.

संविधान रॅली मुख्य प्रशासकीय भवन येथे आल्यावर कुलगुरू आणि प्र-कुलगुरू यांच्या हस्ते डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे डॉ. गौतम गवळी, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. शरद बनसोडे, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. ए. बी. कोळेकर, डॉ. कैलास सोनवणे, डॉ. प्रकाश कांबळे, डॉ. सुनील गायकवाड, डॉ. किशोर खिलारे, डॉ. तेजपाल मोहरेकर आदी उपस्थित होते.

15 APR 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विविध कार्यक्रमांतून डॉ. आंबेडकरांना मानवंदना

जिल्ह्यात विविध संस्था, संघटना, पक्षातर्फे अभिवादन : अनेक ठिकाणी मिरवणुकांत ढोल, ताशा आणि लेझीम पथकांचा समावेश

## डॉ. बाबासाहेबांना लोकशाहीकडे नेणारे शिक्षण अभिप्रेत

ॲमिटी विद्यापीठाचे डेप्युटी प्र-कुलगुरू डॉ. गौतम गवळी यांचे प्रतिपादन : मान्यवर उपस्थित

प्रतिनिधी
कोल्हापूर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समग्र चळवळीचे ध्येय हे व्यक्तीमत्त्व पुनर्स्थापनेचे होते. त्यासाठी त्यांनी आयुष्यभर शिक्षणाचा ध्यास घेतला. सातत्याने शिकत राहणे, कालांतराने निरुपयोगी सोडून देणे आणि नव्याने नवीन ज्ञान संपादन करणे, हे त्यांच्या शिक्षणाचे सूत्र होते. समताधिष्ठित लोकशाहीकडे घेऊन जाणारे शिक्षण भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत होते, असे प्रतिपादन ॲमिटी विद्यापीठाचे डेप्युटी प्र-कुलगुरू डॉ. गौतम गवळी यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या फुले- शाहू- आंबेडकर सप्ताहांतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार व कार्य' हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.



कोल्हापूर : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. गौतम गवळी आदी.

डॉ. गवळी म्हणाले, विषमतेचे मूळ शोधणे आणि ती समूळ नष्ट करण्यासाठी उपाययोजना करणे, हे उद्दिष्ट घेऊन डॉ. आंबेडकर काम करीत होते. कौशल्यांचा मानवी व्यक्तिमत्वात विकास होणे आवश्यक असल्याचे बाबासाहेबांचे मत होते.

अध्यक्षस्थानावरून कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, महामानवांची प्रतीके, प्रतिरूपे ही प्रेरणादायी असतात. त्यांच्या विचाराची प्रेरणा घेण्यासाठी चांगले व सकस वाचन, चांगली ग्रंथसंपदा असेल, तर उत्तम ज्ञानसंचय शक्य असतो. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी प्रास्ताविक केले. अविनाश भाले यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. महाजन, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, डॉ. रामचंद्र पवार आदी उपस्थित होते.

### विद्यार्थ्यांनी काढली संविधान रॅली

शिवाजी विद्यापीठाच्या वसतिगृहातील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी विद्यापीठ परिसरातून संविधान रॅली काढली. डॉ. आंबेडकर यांच्यासह छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतीराव फुले, राजर्षी शाहू महाराज, सावित्रीबाई फुले आणि माता रमाई आंबेडकर यांच्या वेशभूषेतील विद्यार्थी रॅलीचे नेतृत्व करीत होते. ढोल, ताशा आणि झांजपथकाच्या तालावर विद्यार्थ्यांनी लेझीमची प्रात्यक्षिकेही सादर केली.

15 APR 2025
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राजाराम महाराजांवरील दोन पुस्तकांचे आज प्रकाशन

**कोल्हापूर :** छत्रपती राजाराम महाराज करवीर (दुसरे) यांची आज शतकोत्तर जयंती. यानिमित्ताने ज्यांच्या घराण्यातून ते दत्तक आले होते त्या घराण्यातील विद्यमान उद्योजक, व्यावसायिक आणि शिक्षण संस्थाचालक रा. अ. बाळ पाटणकर यांच्या पुढाकारातून आणि शिवाजी विद्यापीठाच्यावतीने आज, मंगळवारी दोन पुस्तकांचे प्रकाशन होणार आहे. भवानी मंडप येथील मेन राजाराम हायस्कूलच्या सभागृहात सायंकाळी साडे पाच वाजता हा कार्यक्रम होणार आहे.

प्राचार्य डॉ. इस्माईल पठाण लिखित छत्रपती राजाराम महाराज करवीर दुसरे १८६६-१८७० आणि प्रा. डॉ. रघुनाथ कडाकणे अनुवादित यात्रा युरोपची छत्रपती राजाराम महाराज व्दितीय यांची रोजनिशी १८७० या दोन पुस्तकांचे प्रकाशन खासदार शाहू छत्रपती यांच्या अध्यक्षतेखाली, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमाला ज्येष्ठ इतिहासकार डॉ. जयसिंगराव पवार, नाबार्डचे माजी अध्यक्ष डॉ. यशवंत थोरात आणि माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर उपस्थित राहणार आहेत.

15 APR 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# परिवर्तनशील आशयसमृद्ध लघुपटांचे विद्यापीठात सादरीकरण

कोल्हापूर, ता. १४ : शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सुरू असलेल्या 'फुले-शाहू-आंबेडकर साप्ताह-२०२५'अंतर्गत शनिवारी सामाजिक, आर्थिक, पर्यावरणीय, शांतता व सलोखा इत्यादी परिवर्तनशील आशयसमृद्ध लघुपटांचे सादरीकरण करण्यात आले.

विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात प्रशांत सुतार दिग्दर्शित 'रबरबँड', मोहम्मद बक्षी दिग्दर्शित 'आर यु व्हॉलीबॉल', उमेश मालन दिग्दर्शित 'दळण' आणि एल. प्रियंका दिग्दर्शित 'धुंदाळ' या लघुपटांचा समावेश होता. या लघुपटांच्या अनुषंगाने विशेष चर्चा झाली. चित्रपट समीक्षक डॉ. अनमोल कोठडिया यांनी या चर्चेचे संचलन केले. डॉ. विद्यानंद खंडागळे यांनी स्वागत केले. अध्यक्षस्थानी डॉ. श्रीकृष्ण महाजन होते. या लघुपट सादरीकरण आणि विशेष चर्चेमध्ये सामाजिक कार्यकर्ते, प्राध्यापक, विद्यार्थी सहभागी झाले. यावेळी डॉ. विलास सोयम, शोभा शेट्ये, विद्या महाजन, स्मिता पाटील, सुनील एम. एन., अविनाश भाले, किशोर खिलारे, अतुल जाधव, अक्षय जाहगीरदार, शुभांगी श्रावस्ती, सुशांत पंडित, विक्रम कांबळे उपस्थित होते. डॉ. तेजपाल मोहरेकर यांनी आभार मानले.

15 APR 2025 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सामाजिक न्यायासाठी लोकशाही मार्गाने संघर्ष आवश्यक

## डॉ. राधेश्याम जाधव; डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त व्याख्यान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

जात म्हणजे दुसरे काही नसून एक बंदीस्त वर्ग आहे. हा वर्ग स्वातंत्र्य, समता व बंधुता या न्यायावर आधारित नसतो. धार्मिक, राजकीय आणि आर्थिक सत्ता त्यांना पाहिजे तसे या वर्गाला गुलामासारखी वागणूक देत असतो. त्यामुळे सामाजिक न्यायासाठी लोकशाही मार्गाने संघर्ष हाच पर्याय आहे. त्यासाठी संविधानिक मार्गाची कास धरली पाहिजे, असे मत 'द हिंदू' वृत्तपत्र समूहाचे (पुणे) वरिष्ठ उपसंपादक डॉ. राधेश्याम जाधव यांनी व्यक्त केले.

राजर्षी शाहू छत्रपती मेमोरियल ट्रस्टच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यानात डॉ. जाधव बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार होते. ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर, शिवाजी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव प्रमुख उपस्थित होते. शाहू स्मारक भवनात व्याख्यान झाले.

### महामानवांना जातीच्या चौकटीत बसविणे चुकीचे

प्रथा, परंपरा, रुढीवर आधारित भारतीय समाजव्यवस्था नाकारल्याशिवाय नवीन सामाजिक रचना होणार नाही, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा जोतिबा फुले यांचे मत होते. महामानवांना जातीच्या चौकटीत बसविणे चुकीचे आहे. सामाजिक न्याय म्हणजे स्वातंत्र्य, समता, बंधुता असून त्यासाठी सकारात्मक संघर्ष करावा लागेल, तरच बुद्धिप्रामाण्यवाद आणि ज्ञानाधिष्ठित समाजव्यवस्था निर्माण होईल.

डॉ. जाधव म्हणाले, राजकारणातील भक्ती आणि व्यक्तीपुजा हे अधिपतनाकडे नेणारी असू शकते. राजकीय, धार्मिक आणि आर्थिक सत्ता ज्यावेळी हातात हात घालून काम करतात त्यावेळी सामान्यांना न्याय मिळणे दुरापास्त होते. त्यामुळे शोषित माणसाला सामाजिक न्याय मिळविण्यासाठी संघर्ष करायला पाहिजे.

डॉ. जयसिंगराव पवार म्हणाले, डॉ. आंबेडकर यांनी आयुष्यभर वैचारिक प्रबोधन केले. समाजाला वारंवार जागे करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. सामाजिक न्याय हाच समाजसुधारकांचा आग्रह होता. देशात सर्व काही जातीवर आधारित आहे. परंतू आता जात मागे टाकून वर्गाकडे वाटचाल सुरू आहे.

डॉ. आंबेडकर यांनी लोकशाहीच्या बाबतीत इशारे दिले होते. नेत्यांच्या चरणी स्वातंत्र्य अर्पण करू नका, बुद्धी गहाण टाकू नका, असे डॉ. आंबेडकर सांगत होते, असेही डॉ. पवार यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 APR 2025
तरुण भारत

# सखोल ज्ञान मिळवाल तरच भविष्यात टिकून राहाल : डॉ. प्रमोद पांडव

रुकडी : पदवी घेऊन महाविद्यालयातून बाहेर पडल्यानंतर चांगला नागरिक बनण्याबरोबर चांगले कर्तृत्व करावे, ही आई–वडीलांसह शिक्षकांचीही अपेक्षा असते. ती पूर्ण करण्यासाठी शिक्षण घेत असताना विविध विषयांचे सखोल ज्ञान मिळवा तरच आयुष्यात, भविष्यात टिकून राहाल. पदवी बरोबरच विविध कौशल्ये आत्मसात करा, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे उपकुलसचिव डॉ. प्रमोद पांडव यांनी केले. येथील राजर्षी शाहू कला व वाणिज्य महाविद्यालयातील बी.ए., बी.कॉम. भाग ३ आणि एम. ए. भाग २ मधील विद्यार्थ्यांच्या शुभेच्छा समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. प्रशांतकुमार कांबळे होते. स्वागत व प्रास्ताविक डॉ. गिरीश मोरे यांनी केले. पाहुण्यांची ओळख डॉ. हिंदुराव संकपाळ यांनी करून दिली. विद्यार्थ्यांच्यावतीने श्रेयस सक्सेना, सौरभ शिंदे, शमशाद जमादार, उदय बनकर, प्राची जाधव मुस्कान मुल्ला, अन्सार नदाफ तर शिक्षकांच्यावतीने डॉ. शर्मिला साबळे यांनी मनोगत व्यक्त केले. आभार क्षितिजा बागडी यांनी मानले. सूत्रसंचालन श्रद्धा कांबळे, सुहानी चौगुले यांनी केले.